महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्रमांक - 020-26114804 E-Mail - mahsulpune1@gmail.com

जिल्हाधिकारी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
क्र.जि.आ.व्य./वाहन अधि./कावि/१०७/२०२०
दिनांक : २९/०५/२०२०

प्रती,

१) मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे
२) मा.आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी.

**विषय : अधिग्रहित करणेत आलेल्या रूग्णवाहिकांना भाडे प्रदान करणेबाबत.....**

उपरोक्त विषयी कोरोना विषाणू प्रादुर्भाव नियंत्रण व प्रतिबंधीत करण्याच्या अनुषंगाने इकडील कार्यालयाकडून रुग्णवाहिका अधिग्रहीत करणेबाबतची कार्यवाही चालु आहे. त्यानुसार आपले मागणीचे अनुषंगाने विविध संस्थेकडील रूग्णवाहिका अधिग्रहित करून त्या वापरणेकरीता आपणांकडे वर्ग करणेत आलेल्या आहेत.

तथापी या कार्यालयाकडून अधिग्रहीत करणेत आलेल्या रूग्णवाहिका या खाजगी स्वरूपाच्या असल्याने सदर रूग्णवाहिका धारकांना रूग्णवाहिका वापराबाबतचे भाडे प्रदान करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे यांचेकडील पत्र क्र.३७३०/प्रापप्रा/प्रापका/पुणे/२०२०, दि. २८/०५/२०२० अन्वये रूग्णवाहीका तसेच शासकीय कामासाठी अधिग्रहीत करण्यात येणाऱ्या इतर वाहनांचे भाडेदर निश्चित करण्यासंदर्भात प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे यांची परिचलन पध्दतीने बैठक पार पडलेली असून, सदर बैठकीत रूग्णवाहिका तसेच इतर वाहनांचे भाडेदर निश्चित करण्यात आलेले आहेत. सदरच्या बैठकीची प्रत तसेच निश्चित केलेले भाडेदर सादर करणेत आलेले आहेत. सदर दर पत्रकानुसार संबंधित रूग्णवाहिका धारकांना आपलेकडून भाडे प्रदान करणेत यावे, हि विनंती.

मा.जिल्हाधिकारी सो.
यांचे मान्यतेने

(श्रीमती. निता सावंत-शिंदे)
उपजिल्हाधिकारी तथा समन्वय अधिकारी
(वाहन अधिग्रहन कक्ष)

Scanned by CamScanner